पोलीस स्टेशन, रामनगर जि. चंद्रपूर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** राम नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1115 **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**01/11/2022 21:56

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 08/06/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/11/2022

**Time From (वेळेपासून):** 12:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/11/2022 **Time (वेळ):** 21:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 073

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/11/2022 21:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सार्वजनीक बांधकाम विभागचे,मुख्य प्रवेशद्वाराजवळ, नागपुर , रोड सिव्हील लाईन चंद्रपुर, चंद्रपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अभिजीत अनिल मत्ते

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सरकार नगर,चंद्रपुर,चंद्रपुर,राम नगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सरकार नगर,चंद्रपुर,चंद्रपुर,राम नगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7972628015

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल जगन्नाथ शिंदे | | | 1. अहिरकर यांचे घरी किरायाणे, टिचर कॉलनी ,गडचांदुर, कोरपना,गडचांदुर ,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000 रु दराच्या 25 चलनी नोटा आणि 500 रु. दराच्या | 200,000.00 |

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| | | | 300 चलनी नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

200,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
ठिकाण:- चंद्रपूर
दिनांक:- 01/11/2022

मी अभिजीत अनिल मत्ते, वय 28 वर्षे, व्यवसाय- कॉन्ट्रॅक्टर (ठेकेदारी), रा. सरकार नगर, ता. जि. चंद्रपूर येथे राहत असुन दिनांक 07/06/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपुर, येथे प्रत्यक्ष हजर होवून श्री. अविनाश भामरे, पोलीस उप अधीक्षक यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार दिली होती, ती खालीलप्रमाणे आहे.
मी मागील वर्षी सप्टेंबर/आक्टोबर महिण्यामध्ये आर.सि.एल.डब्ल्यु.ई या केंद्र सरकारच्या योजने अंतर्गत मुंगसाजी कॅन्स्ट्रक्शन कंपणी, यवतमाळ तर्फे चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुका येथील पुल बांधणीचे कामे घेतलेली होती. सदर कामासंबंधी मी मुंगसाजी कॅन्स्ट्रक्शन कंपणीचे मालक श्री. संदिप नखाते यांचे सोबत रितसर करार सुध्दा केलेला आहे. सदर पुल बांधणीचे कामे मी मागील अंदाजे दिड महिण्याअगोदर पुर्ण केलेले आहे. मी केलेल्या पुल बांधणीच्या कामाचे निरीक्षण सार्वजनिक बांधकाम उपविभाग जिवती येथील कनिष्ठ अभियंता श्री. शिंदे यांचेकडून करण्यात आलेले आहे. मी केलेल्या संपुर्ण कामाचे अंदाजे 1 कोटी रूपयाचे एकुण 4 बिले आहेत. सदर बिले तयार करून मंजूर करणेकामी सार्वजनीक बांधकाम विभाग, चंद्रपूर येथे पाठविणेकरीता मी दि. 05/06/2022 रोजी सार्वजनीक बांधकाम उपविभाग, कार्यालय जिवती येथे जावून तेथील कनिष्ठ अभियंता श्री. शिंदे यांचेकडे गेलो असता त्यांनी मला सांगितले की, 'तुझे एकुण 4 बिले असुन त्यांची अंदाजे किंमत 1 कोटीचे जवळपास आहे. तुझ्या 4 बिलांपैकी 2 बिलं एक 16 लाखांचे आणि दुसरे 38 लाखांचे असे मी मंजूरीकरीता पाठवितो त्याकरीता तुला माझेसाठी 2 लाख रूपये द्यावे लागतील. सदर 2 बिलं मंजूर झाल्यानंतर तु मला 2 लाख रू. दे. त्यानंतर मी तुझे उर्वरित 2 बिलं मंजूरीकरीता पाठविणार, नाही तर तुझे बिलं तयार करून देणार नाही.' तेव्हा मी त्यांना एवढे पैसे माझेकडे नाही असे म्हणालो असता ते म्हणाले की, ''तुला तेवढे पैसे द्यावेच लागतील नाहीतर मी तु केलेल्या पुल बांधणी च्या कामात त्रुट्या काढून तुझ्या बिलात कपात करून देईल.'' असे म्हणाल्याने मी त्यांना नाईलाजास्तव होकार देवून तेथुन निघून आलो. त्यांनी मला परत आज दि. 07/06/2022 रोजी माझे मोबाईल क्रमांकावर फोन करून मला उद्या दि. 08/06/2022 रोजी सार्वजनीक बांधकाम उपविभाग, कार्यालय जिवती येथे बोलाविले आहे. परंतु मला सार्वजनीक बांधकाम उपविभाग, कार्यालय जिवती येथील कनिष्ठ अभियंता श्री. शिंदे यांना 2 लाख रू. लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय चंद्रपूर येथे प्रत्यक्ष हजर येवून श्री. भामरे साहेब यांचेकडे वरीलप्रमाणे लेखी तक्रार देत आहे. माझा सार्वजनीक बांधकाम उपविभाग, कार्यालय जिवती येथील कनिष्ठ अभियंता श्री. शिंदे यांचेशी कोणताही आर्थिक व उसणवारीचा व्यवहार नाही. तरी माझे तक्रारीवरुन मला मी तालुका जिवती येथील पुल बांधणी केलेल्या कामाचे एकुण 4 बिलं तयार करून मंजूर होणेकरीता सार्वजनीक बांधकाम विभाग, चंद्रपूर येथे पाठविण्याच्या कामाकरीता लाच मागणाऱ्या सार्वजनीक बांधकाम उपविभाग, कार्यालय जिवती येथील कनिष्ठ अभियंता श्री. शिंदे यांचेविरुध्द कार्यवाही होण्याकरीता आपणाकडे लेखी तक्रार देत असून लाच रक्कम म्हणुन आवश्यक असलेले 2 लाख रू. माझें बचतीतुन जमा झालेले लाच रक्कम म्हणुन वापरण्याकरीता आपलेकडे जमा करीत आहे. करीता मला लाचेची मागणी करणाऱ्या सार्वजनीक बांधकाम उपविभाग, कार्यालय जिवती येथील कनिष्ठ अभियंता श्री. शिंदे यांचेविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत

कायदेशीर कारवाई होणेस मी लेखी तक्रार देत आहे. याप्रकारची लेखी तक्रार दिली होती आणि त्यावर माझी सही होती.
सदर तक्रार दिल्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. भामरे साहेब यांनी 17:00 वा. दरम्याण त्यांचे कार्यालयात हजर असलेले ना.पो.कॉ रोशन चांदेकर यांना बोलावुन मा. जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा सामान्य रूग्णालय, चंद्रपूर यांचे नावे पत्र देउन दोन पंच आणणेकरीता रवाना केले. त्यांनतर अदांजे 17:40 वा दरम्याण ना.पो.कॉ. रोशन चांदेकर दोन पंचासह कार्यालयात परत आले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. अविनाश भामरे साहेब यांनी त्यांचे कार्यालयात हजर असलेल्या स्टॉफची व हजर आलेल्या पंचांची ओळख करुन दिली. श्री. अविनाश भामरे, साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर श्री. भामरे साहेब व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.
त्यानंतर पंचासमक्ष पोलीस उप अधीक्षक श्री. भामरे साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरून ना.पो.कॉ. रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. भामरे साहेब यांचेकडे सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम 2 लाख रू. (रू. 2000/- दराच्या 25 चलनी नोटा आणि रू. 500/- दराच्या 300 चलनी नोटा) जमा केलेल्या सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म सांगीतले. तद्नंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रॅसिन पावडर लावली व त्याचे प्रात्याक्षीक करून दाखविले. सदर नोटा एका लिफाप्यात टाकुन सदर लिफापा श्री. भामरे साहेब यांनी स्वत:चे ताब्यात ठेवला. गै.अ. यांनी मला दि. 08/06/2022 रोजी सार्वजनीक बांधकाम उपविभाग, कार्यालय जिवती, जि. चंद्रपूर येथे बोलाविले असल्याने श्री. भामरे साहेब यांनी पुढील कार्यवाही जिवती येथे जावुन करावी लागेल असे सांगुन मला दि. 08/06/2022 रोजी स. 9/30 वा. ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे हजर राहण्याबाबत सांगितले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.
त्यामुळे मी दि. 08/06/2022 रोजी स. 9/30 वा. ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे हजर आलो व अंदाजे 09:40 वा. दरम्यान मी सोबत आणलेल्या चारचाकी वाहनाने तर श्री. भामरे साहेब, दोन्ही पंच व स्टॉफ हे त्यांचे शासकीय वाहनाने जिवती कडे निघालो. अंदाजे 11:50 वा. दरम्यान जिवती येथील कोरपणा रोडवर जंगलात आतमध्ये श्री. भामरे साहेब यांनी आपले शासकीय वाहन थांबविले असता मी पण त्यांचे मागेच माझे वाहन थांबविले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. अविनाश भामरे साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे पडताळणी कार्यवाही करण्याकरीता लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे सुचनेवरुन ना.पो.कॉ. रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे चारचाकी वाहनाने पंच क्र. 01 सह सार्वजनीक बांधकाम उपविभाग, कार्यालय जिवती, जि. चंद्रपूर येथे पडताळणी करीता पाठविले. पडताळणी दरम्यान श्री. शिंदे, कनिष्ठ अभियंता, सार्वजनीक बांधकाम उपविभाग, कार्यालय जिवती, जि. चंद्रपूर यांनी मला मी तालुका जिवती येथील पुल बांधणी केलेल्या कामाचे एकुण 4 बिलांपैकी 2 बिलं तयार करून मंजूर होणेकरीता सार्वजनीक बांधकाम विभाग, चंद्रपूर येथे पाठविण्याच्या कामाकरीता पंचासमक्ष 2 लाख रु. लाचेची सुस्पष्टपणे मागणी करुन सदर लाच रक्कम बिल मंजूर झाल्यानंतर स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे पंच क्र. 1 सह माझे चारचाकी वाहनाने श्री. भामरे साहेब व ला.प्र.वि. चे ईतर स्टॉफ थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. लाचरक्कम मागणी बाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. गै.अ. श्री. शिंदे, कनिष्ठ अभियंता यांनी माझेकडून सदर लाचरक्कम माझे 2 बिलं मंजूर झाल्यानंतर स्विकारण्याची तयारी दर्शविली परंतु केव्हा आणि कोठे द्यावयाची आहे याबाबत स्पष्ट सांगितले नाही. त्यामुळे गै.अ. शिंदे, कनिष्ठ अभियंता हे जेव्हा-केव्हा लाच रक्कम घेवून येण्याबाबत सांगेल तेव्हा आपण त्यांना तात्पुरता होकार देवून वेळ काढून घ्यावी व आम्हास तात्काळ कळवावे असे पोलीस उप अधीक्षक श्री. भामरे सा. यांनी मला सांगितले. तसेच सदर कार्यवाहीबाबत पुर्णपणे गोपनियता बाळगण्याच्या सूचना त्यांचे स्टॉफसह दोन्ही पंच व मला दिल्या. त्यानंतर आम्ही सर्व चंद्रपूर येथे आलो. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री. भामरे सा. यांनी पंचनामा क्र. 2 मध्ये घेतलेल्या आहेत.
त्यानंतर काल दिनांक 31/10/2022 रोजी मला गै.अ. शिंदे यांनी फोन करून माझ्या पुल बांधणीच्या कामाच्या बिलांची रक्कम जमा झाली काय? याबाबत विचारणा केली असता मी त्यांना दि. 21/10/2022 रोजी माझे

बँकेच्या खात्यात सदर बिलाची रक्कम जमा झाल्याचे सांगितले. त्यावरुन गै.अ. शिंदे यांनी मला दि. 01/11/2022 रोजी सार्वजनीक बांधकाम विभाग, चंद्रपूर येथे येणार असुन मी तेथे आल्यांनतर फोन करून सांगणार तेव्हा सार्वजनीक बांधकाम विभाग, चंद्रपूर येथे 2 लाख रू. घेवून येण्याबाबत सांगितले. त्यामुळे सदर बाब मी पोलीस उप अधीक्षक श्री. भामरे साहेब ला.प्र.वि. चंद्रपूर यांना फोनव्दारे सांगितली. त्यानुसार श्री. भामरे साहेब यांनी मला आज दिनांक 01/11/2022 रोजी 11:00 वा. दरम्यान ला.प्र.वि., कार्यालय चंद्रपूर येथे हजर राहण्याबाबत सांगितल्याने मी आज रोजी ला.प्र.वि. कार्यालय, चंद्रपूर येथे हजर आलो. तसेच ला.प्र.वि. कार्यालय, चंद्रपूर येथे पडताळणी कारवाई वेळी हजर असलेले दोन्ही पंच हजर होते. अंदाजे दुपारी 02/30 वा. दरम्यान गै.अ. शिंदे यांनी त्यांचे मोबाईल क्र. 7218159589 वरून माझे मोबाईल क्र. 7972628015 वर फोन करून ते सार्वजनीक बांधकाम विभाग, चंद्रपूर येथे आले असल्याबाबत व तेथेच लाच रक्कम घेवून येण्याबाबत सांगितले. त्यामुळे दि. 08/06/2022 रोजी झालेल्या पडताळणी कार्यवाही वरून गैरअर्जदार श्री. शिंदे, कनिष्ठ अभियंता, सार्वजनीक बांधकाम उपविभाग, जिवती यांचेविरूद्ध पुढील सापळा कारवाइ करण्याचे पोलीस उप अधीक्षक, श्री. भामरे साहेब यांनी ठरविले. गै.अ. यांनी 2 लाख रू. लाच स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने मला तक्रार देतांना मी जमा केलेली अँथ्रॅसिन पावडर लावलेली 2 लाख रूपये लाचेची रक्कम देण्यात आली. सदर लाचेची रक्कम माझे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन गैरअर्जदार श्री. शिंदे यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे गळ्यातील दुपट्टा काढुन चेहरा पुसून इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास पकडतील असे सांगण्यात आले.
त्यानंतर श्री. भामरे, साहेब यांचे सुचनेवरुन नापोकॉ. रोशन चांदेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहायाने माझे गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला मी सोबत आणलेल्या दुचाकी वाहन क्र. एम.एच. 34 बी.यु. 4316 नी पंच क्र. 01 यांचेसह सार्वजनीक बांधकाम विभाग, चंद्रपूर येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले. त्यानंतर मी व पंच क्र. 01 सह सार्वजनीक बांधकाम विभाग, चंद्रपूर च्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ जावुन गैरअर्जदार श्री. शिंदे यांची वाट पाहत उभा राहलो. (उर्वरित फिर्याद मुळ फिर्याद प्रमाणे)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Rajesh Bhagwan Muley(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rajesh Bhagwan Mu

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

(बि. एस. चांदेकर)
पोलीस उपनिरीक्षक
पोलीस स्टेशन, रामनगर

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**